**विधि व न्याय विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ एप्रिल, २०१७.

## अधिसूचना

**फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३.**

क्रमांक सीआरसी २०१०/३५५/सीआर-६५/का-११.—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या कलम ११, पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचा कोल्हापूर जिल्ह्यातील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा यांचे न्यायालय आणि कोल्हापूर जिल्ह्यातील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, मलकापूर-शाहूवाडी यांचे न्यायालय यांच्याशी जेथवर संबंध असेल तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, मुंबई उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून, याव्दारे निदेश देत आहे की; दिनांक ८ एप्रिल, २०१७ पासून,—

(क) यासोबत जोडलेल्या अनुसूची "क" कध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ज्या गावांचा कोल्हापूर जिल्ह्यातील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा आणि या सोबत जोडलेल्या अनुसूची "ख" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ज्या गावांचा कोल्हापूर जिल्ह्यातील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, मलकापूर-शाहूवाडी यांच्या अधिकारितेत समावेश करण्यात आला होता त्या गावांना त्यांमधून वगळण्यात येईल व त्या गावांचा कोल्हापूर जिल्ह्यातील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, कळे (खेरीवडे), यांच्या अधिकारितेत समावेश करण्यात येईल;

(ख) यासोबत जोडलेल्या अनुसूची "क" मध्ये नमूद केलेल्या व यासोबत जोडलेल्या अनुसूची "ख" मध्ये नमूद केलेल्या गावांमध्ये उद्‌भवणारी व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, पन्हाळा व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, मलकापूर-शाहूवाडी यांच्याकडे उक्त दिनांकापूर्वी प्रलंबित असणारी फौजदारी स्वरूपाची सर्व प्रकरणे कायद्यानुसार निकाली काढण्यासाठी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कळे (खेरीवडे) कोल्हापूर यांच्याकडे वर्ग करण्यात येतील.

## अनुसूची "क"

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पन्हाळा यांच्या अधिकारितेतून वगळलेल्या व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कळे (खेरीवडे) यांच्या अधिकारितेत समावेश केलेल्या गावांची सूची.—

नियोजित कळे येथील न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येणारी पन्हाळा

तालुक्यातील कासारी नदीच्या दक्षिणेकडील ६२ गावांची नावे.

| अ. क्र. | गावाचे नाव | अ. क्र. | गावाचे नाव | अ. क्र. | गावाचे नाव | अ. क्र. | गावाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कळे | १७ | आकुर्डे | ३३ | पिसात्री | ४९ | देवठाणे |
| २ | मरूळी | १८ | गोटे | ३४ | मानवाड | ५० | खोतवाडी |
| ३ | पाचगांव | १९ | काटेभोगाव | ३५ | पाट पन्हाळा | ५१ | शिंदेवाडी |
| ४ | खेरिवडे | २० | तळेवाडी | ३६ | घोटणे | ५२ | माजगांव |
| ५ | घरपण | २१ | पोहाळवाडी | ३७ | कोलीक | ५३ | यवलुज |
| ६ | परखंदळे | २२ | पोहाळे तर्फे बोरगांव | ३८ | वाशी | ५४ | पडळ |
| ७ | तांदुळवाडी | २३ | वाळोली | ३९ | पडसाळे | ५५ | सातर्डे |
| ८ | मेंघानेवाडी | २४ | वारनुळ | ४० | पोंबरे | ५६ | बांदरेवाडी |
| ९ | सावर्डे | २५ | कुंभारवाडी | ४१ | माजनाळ | ५७ | पुशिरे |
| १० | सुळे | २६ | साळवाडी | ४२ | पुनाळ | ५८ | म्हाळुंगे |
| ११ | गोगवे | २७ | वाळवेकरवाडी | ४३ | कसबा ठाणे | ५९ | भोगांव |
| १२ | कोदवडे | २८ | बळपवाडी | ४४ | महाडिकवाडी | ६० | मोताईवाडी |
| १३ | वाघुर्डे | २९ | मल्हारपेठ | ४५ | मुगडेवाडी | ६१ | काउरवाडी |
| १४ | वेतवडे | ३० | पणोरे | ४६ | सुंभेवाडी | ६२ | पणुत्रे |
| १५ | आंबर्डे | ३१ | किसरुळ | ४७ | कांडारवाडी | | |
| १६ | हारपवडे | ३२ | काजवडे | ४८ | वानरवाडी | | |

## अनुसूची "ख"

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालय, मलकापूर-शाहूवाडी यांच्या अधिकारितेतून वगळलेल्या व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कळे (खेरीवडे) यांच्या अधिकारितेत समावेश केलेल्या गावांची सूची.

नियोजित कळे येथील न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट

होणारी शाहूवाडी न्यायालयातील १६ गावांची नावे

| अ. क्र. | गावाचे नाव | अ. क्र. | गावाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | नांदगाव | १० | करंजफेण |
| २ | नांदारी | ११ | येळवडी |
| ३ | घुंघुर | १२ | काटे |
| ४ | परळी | १३ | येळवडी |
| ५ | सोनुर्ले | १४ | बर्की |
| ६ | मालापुडे | १५ | काटे |
| ७ | कतालेवाडी | १६ | बरंबाळ |
| ८ | पेंडागले | | |
| ९ | पाल | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नी. प्र. धोटे,**
शासनाचे सहसचिव.

## विधि व न्याय विभाग

पाचवा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ जानेवारी २०२२.

### शुद्धीपत्र

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक सीआरसी-२०१०/३५५/सीआर-६५/का-११.— दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजीच्या **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक ३४ अन्वये प्रसिद्ध झालेल्या शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक सीआरसी-२०१०/३५५/सीआर-६५/का. ११, दिनांक ३ एप्रिल २०१७ मधील पृष्ठ क्रमांक ६ वरील—

(अ) अनुसूची ‘‘क ’’ मधील—

(१) अ.क्र. ८ येथील ‘‘ मेंघानेवाडी ’’ ऐवजी ‘‘ मेंगाणेवाडी ’’ असे वाचण्यात यावे.

(२) अ.क्र. ९ येथील ‘‘ सावर्डे ’’ ऐवजी ‘‘ सावर्डे तर्फ असंडोली ’’ असे वाचण्यात यावे.

(३) अ.क्र. १८ येथील ‘‘ गोटे ’’ ऐवजी ‘‘ गोठे ’’ असे वाचण्यात यावे.

(४) अ.क्र. ३२ येथील ‘‘ काजवडे ’’ ऐवजी ‘‘ काळजवडे ’’ असे वाचण्यात यावे.

(५) अ.क्र. ३६ येथील ‘‘ घोटणे ’’ ऐवजी ‘‘ गोठणे ’’ असे वाचण्यात यावे.

(६) अ.क्र. ३९ येथील ‘‘ पडसाळे ’’ ऐवजी ‘‘ पडसाळी ’’ असे वाचण्यात यावे.

(७) अ.क्र. ५७ येथील ‘‘ पुशिरे ’’ ऐवजी ‘‘ पुशिरे तर्फ बोरगांव ’’ असे वाचण्यात यावे.

(८) अ.क्र. ५८ येथील ‘‘ म्हाळुंगे ’’ ऐवजी ‘‘ म्हाळुंगे तर्फ बोरगांव ’’ असे वाचण्यात यावे.

(९) अ.क्र. ५९ येथील ‘‘ भोगांव ’’ ऐवजी ‘‘ बाजारभोगाव ’’ असे वाचण्यात यावे.

(१०) अ.क्र. ६२ येथे ‘‘ पणुत्रे ’’ हे ‘‘ पणुत्रे ’’ असेच वाचण्यात यावे.

तसेच अ.क्र. ६२ नंतर अ. क्र. ६३ येथे ‘‘ पोर्ले तर्फ बोरगांव ’’ या गावाचा समावेश करण्यात येत आहे. व पृष्ठ क्रमांक ७ वरील—

(ब) अनुसूची ‘‘ख ’’ मधील—

(१) अ.क्र. ६ येथील ‘‘ मालापुडे ’’ ऐवजी ‘‘ माळापुडे ’’ असे वाचण्यात यावे.

(२) अ.क्र. ७ येथील ‘‘ कतालेवाडी ’’ ऐवजी ‘‘ कातळेवाडी ’’ असे वाचण्यात यावे.

(३) अ.क्र. ८ येथील ‘‘ पेंडागले ’’ ऐवजी ‘‘ पेंडाखळे ’’ असे वाचण्यात यावे.

(४) अ.क्र. १५ येथील ‘‘ काटे ’’ ऐवजी ‘‘ कांटे ’’ असे वाचण्यात यावे.

(५) अ.क्र. १६ येथील ‘‘ बरंबाळ ’’ ऐवजी ‘‘ बुरंबाळ ’’ असे वाचण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**यो. ही. आमेटा,**
शासनाचे सहसचिव.